# शिवतीर्थावरून..! भाग १
# जो कार्डोझा : दुर्मिळ गाड्यांचा शौकीन व संग्राहक




"जयंता, मुंबईत उतरल्यावर आंघोळ करून सर्वप्रथम मी दर्शन घेतो ते शिवाजी पार्कचे. मग लोकांना बाजूला करून कट्ट्यावर सुखाने बसतो. आणि शिवतीर्थाचं पुण्य लाभल्याचं पुण्य पदरी पाडून घेतो..." असं माझे न्यू जर्सीचे मित्र डॉ. कै. यशवंत कारखानीस नेहमी सांगत. आज त्या सुगंधी कट्ट्यावर बसल्यावर कारखानीसांची आठवण प्रथम आली. बालमोहन विद्यामंदिर शाळेच्या समोर शिवाजी पार्क जिमखान्याचा उत्कृष्ट फास्ट स्विंग बोलर गण्या कर्णिक यांच्या बिल्डिंगमध्ये हे यशवंत कारखानीस रहात होते. माझ्या वडिलांचे विद्यार्थी, स्नेही व परिचित. त्यामुळे ते माझेही स्नेही झाले होते. थोडक्यात, शिवाजी पार्कवर व शिवाजी पार्कच्या रहिवासीयांवर त्यांचे प्रचंड प्रेम होते. त्यातून आम्हीही शिवाजी पार्कचे म्हणून माझ्यावर लोभ होता. असो.



आमच्या परवाच्या मुंबई मुक्कामात शिवाजी पार्कला प्रभात फेरी मारून झाल्यावर मी व वीणा दीक्षितांच्या (माधुरी दीक्षितच्या आजोबांच्या) घरासमोर बसलो होतो. दूषित हवेतील प्राणवायू नांहीसा झाला होता. घाम पुसत असतांना मला अचानक अत्यंत जुन्या कन्व्हर्टिबल गाडीतून एक जोडपं

जातांना दिसलं. आणि शिवाजी पार्क जिमखान्याच्या जवळ जाऊन तेथे विसावलं. ती गाडी पाहून माझा घाम पार नाहींसा झाला आणि मी चक्क त्या गाडीजवळ धांव मारली. कारण, जुन्या अँटिक गाड्यांचे पॅशनेट संग्राहक मी अमेरिकेत अनेकदा पहिले आहेत व त्यांच्या कहाण्या ऐकल्या आहेत. परंतु, शिवाजी पार्कवर माझ्या डोळ्यासमोर मी प्रत्यक्ष त्याचा अनुभव घेतोय यावर माझा विश्वासच बसत नव्हता. गॉल्फची टोपी घातलेली सव्वा सहा फूट उंचीची ती धिप्पाड व्यक्ती व त्याची बायको त्या छोट्याशा गाडीत रुबाबदारपणे बसली होती. त्या जोडप्याची स्तुती व अभिनंदन करून मी माझी ओळख करून घेतली. अत्यंत अदबीने नमस्कार करून त्यांनी मला त्यांचीही ओळख करून दिली व त्या गाडीत मला आनंदाने बसविले. त्या मालकाचे नांव होते ‘जो कार्डोझा' व पत्नीचे नांव होते 'व्हिक्टोरिया'. आश्चर्य म्हणजे, मी मराठी असल्याने बोलतांना आमचा सर्व मामला शुध्द मराठीतून चालला होता.





मी ती गाडी न्याहाळून पाहात असतांना जोने मला त्या गाडीचा संपूर्ण इतिहास कथित केला. ती १९३६ मधील तांबड्या आणि काळ्या रंगाची चकाचक देखणी मॉरिस गाडी होती. मंडळी, आज जुनी गाडी सांभाळणे म्हणजे खिश्यात करोडोंनी पैसे हवेत. सुमारे चार माणसांचा होणारा अथवा करावा लागणारा खर्च ध्यानात आणा. थोडक्यात, हा जो कार्डोझा करोडपती होता हे मी वेगळे सांगायला नको. परंतु, वागायला अत्यंत साधा माणूस. शिवाय, ही त्याची एकच गाडी नव्हती. अशा अनके निरनिराळ्या जुन्या गाड्या त्याच्याकडे आहेत. हा महागडा शौक तो अनेक वर्ष सांभाळून आहे. मी आपणहून त्याची ओळख करून घेतली याचे त्याला अप्रूप वाटले होते. नाहीतर, अनकेदा लांबून त्याची टेहळणी करणारी गर्विष्ठ माणसं त्याला कशी भेटली आहेत याचे किस्से त्याने मला सांगितल्यावर मी चाट पडलो होतो. मुंबईत किंवा भारतात होणाऱ्या अँटिक कार रॅलीत जोच्या अनके गाड्या असतात. या १९३६ मधील मॉरिस गाडीने नुकत्याच झालेल्या अँटिक कार रॅलीत सर्वप्रथम पारितोषिक मिळवले होते. हे तो अभिमानाने सांगत होता. "कुळकर्णीसाब, तुम्ही उद्या माझ्या घरी या. आम्ही माहीमला पॅरेडाइझ सिनेमाच्या मागे राहातो. तेथे माझ्या इतर अनेक जुन्या अँटिक गाड्या आहेत. त्या बघून तृप्त व्हाल.”




***(गेल्या वर्षी Vintage and Classic Car Rally मध्ये जोच्या कन्व्हर्टिबल 'मॉरिस' गाडीला प्रथम पारितोषिक मिळाल्याचे सर्टिफिकेट व उजवीकडून दुसरा पांढऱ्या टोपीत इतरांबरोबर जो कार्डोझा...)***

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मी जोच्या घरी गेलो होतो. त्याचे ते प्रशस्त घर पाहून मी चक्रावलो. त्याच्या घरी प्रथम माझं स्वागत केलं ते माझ्या उंचीच्या सेंट बर्नार्ड या मोठ्या कुत्र्याने. जो कार्डोझाचं व्यक्तिमत्व व व्यक्तित्व त्याच्या ऐश्वर्यासह बघण्यासारखं होतं. शिष्टाचार पाळणाऱ्या जोचे पाय अजूनही जमिनीवर आहेत. उत्तम पाहुणचार झाल्यावर जोने मला त्याच्या सर्व गाड्या दाखविल्या. हा सर्व शौक कसा सांभाळतो याची मला जाणीव करून घ्यायची होती. तेव्हा जो म्हणाला, "माझ्या येथे व गोव्याला अनके वडिलोपार्जित प्रॉपर्टीज आहेत. गोव्याला पोर्तुगिझांचे राज्य असतांना जुन्या गाड्या रिस्टोर करण्याचा मला शौक लागला होता. मी त्याला क्युबामध्ये असलेल्या जुन्या अमेरिकन दुर्मिळ गाड्यांची आठवण करून दिली. त्यावर तो म्हणाला, "जयंतराव, त्या सर्व गाडयांची इंजिने ओरिजनल अमेरिकन नाहीत. फक्त गाड्यांच्या बॉडीज आहेत. माझ्याकडील प्रत्येक गाड्यांचे सर्व पार्टस हे ओरिजिनल आहेत. त्यासाठी मी अमाप पैसा खर्च केला व करीत आहे." अमेरिकेतून व जगात इतर देशातून त्या सर्व गाड्यांचे ओरिजिनल पार्टस मी मागवून बेळगांवला त्याचे रिस्टोरेशन करीत होतो व केल्या आहेत. मी स्वतः परदेशी ऑफशोर ऑइल रिग्स ड्रिलिंग कंपनीत चेन्नई येथे टेक्निशियन म्हणून काम करतो. उद्या मी फ्लाय करून चेन्नईला एक महिन्यासाठी कामाला जात आहे. आपली भेट झाली त्यामुळे मी आनंदात आहे. आपली थोडक्यात चुकामूक झाली असती. आपण खूप भाग्यवान आहात. तसेच आपली ओळख झाली त्यामुळे आम्हीही." त्याच रात्री जोला एका बर्थडे पार्टीला जायचे होते. परंतु, केवळ माझी भेट होणार नाही म्हणून माझ्यासाठी तो थांबला होता. त्याचा सर्व थाट पाहून, गाड्या पाहून झाल्यावर त्याने मला मला त्याच्या दुसऱ्या एका भल्या मोठ्या गाडीतून शिवाजी पार्कला आमच्या घरी सुखरूप पोहोचविले होते. त्यावेळी रात्रीचे अकरा वाजले होते. "पुढल्या वेळी मी तुमच्या घरी नक्की येईन, कदाचित आपली भेट अमेरिकेतही होईल... असो. मला केक कापायला जायचे आहे. ती सर्व मंडळी माझ्यासाठी थांबली आहेत. कुळकर्णीसाब, मी आपली रजा घेतो. उद्या माझी बायको तुमच्या घरी येऊन तुम्हाला माझं सर्व मटेरियल, फोटोज व माहिती द्यायला येईल. लेख जरूर पाठवावा. धन्यवाद."







जोला शिकली सवरलेली, उत्तम वळण व संस्कार असलेली दोन गुणी मुलं आहेत. मुलगा 'व्हेंचुरा' हा जो पेक्षाही उंच आहे. तसेच, सूनबाई 'ब्रिटनी' ही दिसायला अतिशय सुंदर. माझ्या पदरी कार्डोझा कुटुंबाची ओळख नव्हे, नातं जुळल्याचा मला मनस्वी आनंद झाला होता. हे वेगळे सांगायला नको. 'ग' ची बाधा न झालेल्या जोच्या गोव्यात अनेक इस्टेटी असून 'ल कसिटा' नांवाची होटल्स व कॉटेजिस आहेत. तसेच, लग्न समारंभ व इतर कार्याला त्याच्या जुन्या गाड्या तो भाड्याने देतो. मात्र, तो किंवा त्याच्या घरची मंडळी स्वतः त्या गाड्या चालवितात. मी त्याला अमेरिकेतून खास गॉडफादरची कॅप भेट दिली. त्याने ती लगेच डोक्यावर चढवली व पुढील अँटिक कार रॅलीत त्याचा उपयोग करीन याची ग्वाही देऊन शुभेच्छा व्यक्त केली.

(क्रमशः)

**- जयंत कुळकर्णी**